18 JAN 2018

जा.क्र. पोआअ/प्रबंधक शाखा/संगणक-प्रिंन्टर वार्षिक दरकरार/ 729 /२०१८ अमरावती शहर दिनांक -१८/१/२०१८

**विषय :-** या आस्थापनेवरील १४३- संगणक , ९२- प्रिंन्टर्स चा साहीत्यासह दुरूस्ती करीता वार्षिक दरकरार करणे करीता दोन लिफाफा पध्दतीनुसार दरपत्रके सादर करणे बाबत.

-oooo-

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरून कळविण्यात येते की, या आस्थापनेवरील सर्व पोलीस स्टेशन (१०-पो.स्टे.) तसेच सहायक पोलीस आयुक्त, राजापेठ/गाडगेनगर/फ्रेजरपुरा/शहर वाहतुक विभाग , पो.नि. श.वा.शा., महीला सेल, पोलीस मुख्यालय, बि.डी.डी.एस., तसेच पोलीस आयुक्तालयातील सर्व शाखा/विभाग, इत्यादी ठिकाणी कार्यरत असलेले संगणक व प्रिंन्टर्स चा साहीत्यासह सन २०१८ करीता वार्षिक दुरूस्ती व देखभाल करार करावयाचा आहे. त्याकरीता अधिकृत कंपनी विक्रेता/पुरवठादार यांचेकडून दोन लिफाफा पध्दतीनुसार सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तरी ईच्छूक अधिकृत विक्रेते/पुरवठादारांनी त्यांची दोन लिफाफा पध्दतीनुसार सिलबंध दरपत्रके या कार्यालयातील प्रबंधक शाखेत हे पत्र निर्गमित झाल्याचे दिनांकापासून ०७ दिवसापर्यंत म्हणूजेच दिनांक २५/०१/२०१८ ला १२.०० वाजेपर्यंत पर्यंत (शासकीय सुटी वगळून) प्रबंधक शाखेत ठेवण्यात आलेल्या सिलबंद बॉक्समध्ये दाखल करावीत.

पहिला लिफाफा हा तांत्रिक लिफाफा म्हणून (विवरणपत्रा-१) आणि दुसरा लिफाफा (विवरणपत्रा-२) असे दोन लिफाफा पध्दतीने दरपत्राके सादर करणे अनिवार्य आहेत. तांत्रिक लिफाफ्यामध्ये खालील आवश्यक कागदपत्रे असणे अनिवार्य आहे.

१. पुरवठादारांचे फर्म नोंदणी प्रमाणपत्र
२. पॅन कार्डची छायांकीत प्रत
३. GST प्रमाणपत्राची छायांकीत प्रत
४. कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र
५. संगणक व प्रिंन्टर्स मध्ये टाकावयाचे सर्व स्पेअरपार्ट /टोनर ची अधिकृत कंपनीची यादी व प्राईजलिस्ट
६. संगणक व प्रिंन्टर दुरूस्ती व देखभाल करीता नेमण्यात येणा-या अधिकृत तज्ञांचे नांव व त्यांची शैक्षणीक पात्रता व अनुभवबाबत कागदपत्रे

तांत्रिक लिफाफा (विवरणपत्रा-१) मध्ये वर नमुद केलेले आवश्यक कागदपत्रे आढळून आल्यानंतरच दरपत्रकाचा दुसरा लिफाफा उघडण्यात येईल याची कृपया निविदाधारकांनी नोंद घ्यावी. प्राप्त झालेली दरपत्रके उघडण्याबाबतचा दिनांक व वेळ संबधीतांना दुरध्वनीद्वारे/ई-मेलद्वारे सूचीत करण्यात येईल. तसेच विवरणपत्र-२ मध्ये संगणक व प्रिंन्टर्स चा वार्षिक दुरूस्ती व देखभाल बाबत वार्षिक दरकराचे प्रतीमहा वेगवेगळे दरपत्रक व त्यासोबत अधिकृत कंपनीची प्राईज लिस्ट इत्यादी कागदपत्रे असणे अनिवार्य आहे, सदरचे पत्र हे या कार्यालयाचे cp.amravari@mahapolice.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा अपलोड करण्यात आलेले आहेत. तरी ईच्छूक निविदाधारकांनी दोन लिफाफा पध्दतीनुसार दरपत्रके या कार्यालयास विहीत मुदतीत सादर करावीत हि विनंती.

**( एम.एच.बैस )**
कार्यालय अधिक्षक
पोलीस आयुक्त,अमरावती करीता.

**प्रति,**

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

**प्रत,**

पोउपनि, सायबर सेल,

२/- उपरोक्त पत्र हे या कार्यालयाचे संकेतस्थळावर अपलोड करून पृर्तता अहवाल सादर करावा.